# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*


एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९२


**क्र. गो.वि/आस्था/१२६५/२०१७** **दि. : १२/०६/२०१७**

## परिपत्रक

**संदर्भ** :– मा. अव्वर सचिव,महाराष्ट्र शासन,मुबंई यांचे पत्र क्रं.संकीर्ण २०१७/प्र.क्र २२७/विशि–३,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि. २०/५/२०१७.

गोंडवाना विद्यापीठातील संलग्नीत सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्याना सुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार "डिजीटल भारत" योजनेंतर्गत प्रत्येक महाविद्यालयात वायफायची सुविधा मिळण्याबाबतची विनंती श्री. नरेंद्र बाबुराव पवार,माजी विधानसभा सदस्य यांनी केली असून संदर्भीय पत्रानुसार आपल्या महाविद्यालयात सदर प्रकरणी कार्यवाही घ्यावी. तसेच घेतलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

(दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सहपत्र संलग्नः–**

१.उपरोक्त संदर्भिय पत्र.

# महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र. २२७/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक – २०/०५/२०१७.

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय – 'डिजिटल भारत' योजनेंतर्गत राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात वायफायची सुविधा मिळण्याबाबत.

श्री. नरेंद्र बाबूराव पवार, माजी. विधानसभा सदस्य यांनी मा. मंत्री (उ. व तं. शि.) महोदयांना पाठविलेल्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर पत्रान्वये त्यांनी 'डिजिटल भारत' योजनेंतर्गत राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात वायफायची सुविधा मिळण्याबाबतचे आदेश संबंधित विभागास देण्याची विनंती केली आहे.

३. तरी उपरोक्त प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करावी.

( सतिश माळी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत –
संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

२५ प्र-३ १२/४/१७

महाराष्ट्र विधानसभा

आमदार
# नरेंद्र बाबुराव पवार
सचिव, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश
१३८, कल्याण (प.) विधानसभा

३२५८ ८/३/१७

07 MAR 2017
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन ५२ (मोर्च)
दिनांक ६/३/२०१७

जा.क्र.११७. वि.ता. - डिसेंबर. २०१६

5 JAN 2017

दि. ०५/०१/२०१७

प्रति,

मा.ना.श्री. विनोदजी तावडे साहेब,
मंत्री, सांस्कृतिक कार्य,
महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई – ३२.

जा.क्र. ... आवक क्र. ९३/२०१७ दिनांक: २०/०२/२०१७

**विषय :- 'डिजिटल भारत' योजनेंतर्गत राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात वायफायची सुविधा मिळण्याबाबत.**

आदरणीय महोदय,

महाराष्ट्रातील विद्यापीठांची परंपरा इ.स. १८५७ पासून अस्तित्वात आहे. मुंबई विद्यापीठाच्या स्थापनेपासून उच्च शिक्षणाची सुरुवात महाराष्ट्रात झाली. त्यांनतर नागपूर विद्यापीठ इ.स. १९२३ मध्ये स्थापन झाले. पुणे विद्यापीठ इ.स. १९४८ आणि मराठवाडा विद्यापीठ इ.स. १९५६ मध्ये स्थापन झाले. या सर्व विद्यापीठाशी संलग्नित असलेले महाविद्यालयात पुरेशी शैक्षणिक सुविधा मिळणे आवश्यक आहे.

डिजिटल भारत योजनेंतर्गत राज्यातील सर्व महाविद्यालये डिजिटल करून सर्व महाविद्यालयात वायफायची सुविधा उपलब्ध करणे देणे आवश्यक आहे. या माध्यमातून महाविद्यालयामधील ऑप्टिकल फायबर नेटवर्कचे जाळे गडद होईल. विद्यार्थ्यांना दररोज काही एम.बी पर्यंतचा शैक्षणिक डेटा डाऊनलोड मोफत करता येईल.

तरी डिजिटल भारत योजनेंतर्गत राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात वायफायची सुविधा मिळण्याचे आदेश सबंधित विभागास देण्यात यावे ही विनंती.

धन्यवाद !

मा. प्रधान सचिव (उच्च व तंत्र) कृ. पहावे ही विनंती.

कवि-३ १०/३/२०१७

आपला स्नेहांकित,

(नरेंद्र पवार)

विशेष कार्य अधिकारी

विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालये ... त्यामुळे ... उपाययोजना विचाराधीन

जनसंपर्क कार्यालय : गाळा नं. २६, २७, २८ डी व ई विंग, श्री गजानन महाराज नगर को. ऑप. हौ. सो., गजानन महाराज मंदिर जवळ, सम्राट अशोक चौक, एम. के. कॉलेज रोड, कल्याण (प.) जि. ठाणे ४२१ ३०१ दुरध्वनी :- ०२५१-२९७३९३९.
narendrapawar narendrapawar008@gmail.com